# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ७९–२०१०/ दिनांक :

श्री. श्री. माहीन अ. मोमीन ,
रा. ३६ ए/३५/५, मनेष पार्क,
ताराबाई पार्क, कोल्हापूर — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
शहर विभागीय कार्यालय, कोल्हापूर

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
मार्केट यार्ड उप विभागीय कार्यालय, कोल्हापूर — विरूध्द पक्षकार

**कोरम** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. माहीन अ. मोमीन यांनी मे. ए.एन. मोमीन इंजिनीअरींग वर्क्स यांच्या वतीने आपल्या तक्रारी संदर्भात दि. २९.३.२०१० रोजी मंचाकडे तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. मंचाने सदर अर्ज दाखल करुन घेवून कार्यालयीन कार्यवाही पूर्ण झाल्यावर दि. १७.५.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणीची तारीख निश्चित केली होती.

तथापि अर्जदार माहिन अ. मोमीन यांचे दि. २९.४.२०१० रोजी रहाते घरी आकस्मित निधन झाल्याने सदर तारखेस हजर राहून त्यांच्या पत्नी श्रीमती रजिया मा. मोमीन यांनी अर्जामध्ये आपल्या पतीच्या ऐवजी आपल्या नावाची प्रतिनिधी म्हणून दुरुस्ती व्हावी यासाठी अर्ज देवून मुदतवाढ मागून घेतली व त्या प्रमाणे मंचाने कागद हजर करण्यासाठी तसेच प्रतिज्ञापत्र हजर करण्यासाठी मुदत दिली. कागदपत्रे हजर झाल्यानंतर सुनावणीची तारीख निश्चित केली व त्याप्रमाणे मंचासमोर सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्यावेळी सुधारित नोंदीप्रमाणे श्रीमती रजिया मोमीन, वि.प.तर्फे श्री. ताडे, उप कार्यकारी अभियंता व श्री. गावडे, सहाय्यक लेखापाल उपस्थित होते.

ग्राहकाचा तक्रार मागणी अर्ज वि.प.ची भूमिका अंतर्गत कक्षाचा निर्णय सुनावणी दरम्यानची कथने या सर्वाचे आधारे ग्राहकाच्या तक्रारीचे सर्वसाधारण स्वरुप व वि.प.ची भूमिका पुढील प्रमाणे आहे.

ग्राहकाच्या तक्रारीचे सर्वसाधारण स्वरुप

मे. ए.एन. मोमीन इंजिनीअरींग वर्क्स या नांवे शिरोली एमआयडीसी कोल्हापूर येथे . दि.२२.७.१९७८ पासून ६३ केव्हीएचे औद्योगिक कनेक्शन मंजूर आहे. सदरच्या खात्यावर येणारे बील वेळच्यावेळी भरत होतो, तथापि व्यवयसायातील अडचणीमुळे दि. १५.१२.२००७ रोजी थकबाकी रक्कम २३,०५०/– यावरुन माझे खाते तात्पुरते बंद केले. सदरची रक्कम दि. ११.६.२००८ रोजी जमा केलेली आहे व तसे पत्र वि.प.कडे देवून वीज जोडणी पूर्ववत चालू करण्याविषयी लेखी कळविले आहे. असे असून सुध्दा वीज जोडणी न दिल्यामुळे वारंवार समक्ष भेटून व लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे. तद्नंतर कंपनीने दि. ४.१.२०१० रोजी अंतिम बील म्हणून रु.१६६७०/– चे बील दिले, तेही बील दि. ७.१.२०१० रोजी भरलेले आहे. या सर्व खटाटोपा नंतरही आजतागायत वीज पुरवठा चालू न केल्याने प्रथमत: कक्षात व नंतर मंचात अर्ज दाखल करावा लागला आहे. माझी वीज जोडणी त्वरीत चालू करुन मिळावी, तसेच मे. ए. एन. मोमीन इंजि. वर्क्स या नांवाने माझे कनेक्शन मंजूर असतांनाही केवळ मे. मोमीन इंजि. वर्क्स असे चुकीचे बील देवून व तशी सुधारणा करण्याविषयी विनंती करुनही चुकीची दुरुस्ती केली नाही. तशी पूर्ववत नोंद होवून मिळावी. रक्कम भरुनही वीज जोडणी देण्यास केलेल्या दिरंगाईबद्दल भरपाई मिळावी व पूर्वीच्या नांवे पूर्वी इतकाचा मंजूर लोड देवून खाते पूर्ववत चालू करावे इ. मागण्या आपल्या अर्जात नोंदविल्या आहेत. त्यासाठी आवश्यक तो पत्र–व्यवहार सोबत जोडला आहे याची मंचाने नोंद घ्यावी अशीही विनंती केली आहे.

वि.प.ची भूमिका व कार्यवाही

वि.प.ने सदरचे कनेक्शन थकबाकीसाठी डिसेंबर २००७ मध्ये कायम स्वरुपी बंद केलेले आहे तसेच अंतिम रिडींग सदरच्या ठिकाणी कूलूप असल्याने अथवा रिडींग उपलब्ध होत नसल्याने घेता आले नाही, ते घेवून ग्रा. तसे बील अदा केले आहे. ग्राहकाने सदरचे बील भरलेले आहे. सदरचा पुरवठा ६ महिन्यापेक्षा जास्त काळापेक्षा कायमचा बंद झाल्याने तसेच सदरचा विद्युत भार दुसऱ्या ठिकाणी वापरला असल्याने भार शिल्लक नसल्याने त्वरित जोडणी देता येणार नाही, तथापि ग्राहकाने नव्याने मागणी अर्ज नोंदवून विशेष बाब म्हणून २५ एच.पी. पर्यंतची जोडणी देण्याचा विचार करता येईल. मात्र त्यासाठी नवीन रोहित्र उभे करणे वा जुन्या रोहित्रावर भार शिल्लक असल्यास तरतुदीनुसार पुरवठा केला जाईल अशी भूमिका वि.प.ने घेतली आहे. त्याचप्रमाणे ग्राहकावर अन्याय होणार नाही याची खात्री दिली आहे. मंचाने सदर प्रकरण हाताळत असतांना जुने कनेक्शन ज्या रेहित्रावर होते त्यावर भार शिल्लक असल्यास त्वरित नवीन कनेक्शन द्यावे असा आदेश दिला आहे व सदरचे कनेक्शन वडिलांचे नांवे असल्याची नोंद आपल्या निकाल पत्रात व मुद्देनिहाय अभिप्रायात नोंदविली आहे.

<u>कारणमिमांसा</u>

सदरचे कनेक्शन औंद्योगिक वापरसाठी एमआयडीसी शिरोली येथे ६३ एचपी इतक्या क्षमतेसाठी दि. २२.७.१९७८ पासून चालू आहे. सदर जोडणीसाठी १८.५.१९७७ रोजी कार्यकारी अभियंता यांनी मे. ए.एन. मोमीन इंजिनीअरींग वर्क्स १४२३/४६, शिरोली एमआयडीसी अशी मंजुरी दिलेली आहे. असे असतांनाही पुढे सदरच्या नावांची नोंद ए.एन. मोमीन इंजिनीअरींग वर्क्स अशी न घेता केवळ मोमीन इंजिनीअरींग वर्क्स एवढीच येत असल्याचे दिसून येते. यासाठी ग्राहकाने संबंधित मंजुरी पत्र सोबत जोडले आहे. तसेच चुकीच्या नोंदीची प्रतही सोबत जोडली आहे, यावरुन हे स्वच्छ आणि स्पष्ट होते की वि.प.कडून अशी नावातील चुकीची नोंद झालेली आहे. सदरचे खाते धंद्यातील कांही अडचणीमुळे रु.२३०५०/– इतक्या थकबाकीसाठी दि. १५.१२.२००७ पासून बंद केलेले आहे. त्यासाठी ग्राहकास कोणत्याही प्रकारची नोटीस अथवा लेखी कळविले नाही. तथपि ग्राहकाने पत्र व्यवहार केल्यावर दि.११.६.२००८ रोजी सदर रकमेचा भरणा करुन तसे मागणी पत्र दि. ७.७.२००८ रोजी वि.प.कडे दिलेले आहे. वि.प.ने सदर पत्राची दखल न घेतल्याने परत ग्राहकाने पत्र व्यवहार केल्याचे दिसून येते. तशा पध्दतीचा पत्र व्यवहार मंचासमोर दाखल कोला आहे. दि. ११.६.२००८ थकबाकी भरल्यानंतर व तसेच लेखी दि. ७.७.२००८ ला कळवूनही वि.प.कडून उचित कार्यवाही झाली नाही. मात्र ४ जानेवारी २०१० रोजी एक पत्राने ३२२३ युनिटचे अंतिम बील ग्राहकास पाठविले. सदर बिलावर जो कालावधी नोंद केला आहे त्या कालावधीकडे लक्ष दिल्यावर असे स्पष्ट होते की, सदरचा कालावधी जानेवारी २००८ ते डिसेंबर २००९ असा नमूद केला असल्याने कनेक्शन तात्पुरते बंद केले असे जी नोंद वि.प.ने वा ग्राहकाने दिली आहे ती चुकीची आहे, कारण जर वीज पुरवठा खंडित केला असेल तर ३२२३ युनिटचे बील कसे काय झाले ? याचा खुलासा वि.प.ने अथवा ग्राहकानेही केलेला नाही. मात्र मंचाच्या ध्यानी ही गोष्ट येत आहे की सदरचा पुरवठा बंद केलेला नाही, कारण थकबाकी नंतरही युनिटचा वापर चालू आहे व त्यामुळे सदरचे कोक्नशन ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी बंद आहे व नवीन जोडणी अर्ज करुन घ्यावी ही वि.प.ची भूमिका विसंगत आहे. तसेच जर वापराचे बील दिले असेल तर असा वीज पुरवठा दुस-यास दिला अगर त्या रोहित्रावर शिल्लक नाही ही वि.प.ची भूमिका दुहेरी वाटत आहे. त्यामूळे ग्राहकाचे मागणीप्रमाणे मे. ए.एन .मोमीन इंजिनीअरींग वर्क्स याच नावाने ग्राहकाचे सुधारित मागणी प्रमाणे व आवश्यकतेनुसार ४० एचपी इतका भार ग्राहकास.अदा करुन ग्राहकाची वीज जोडणी चाचणी अहवाल घेवून आदेशानंतर ३० दिवसांचे आंत त्वरित चालू करावी. तसेच ग्राहकानेही कागदपत्रांची पूर्तता त्वरित करुन देणे आवश्यक आहे. कागदपत्रांची पूर्तता अगर आवश्यक कागद यांस विलंब झाल्यास सदरचा ३० दिवसांचा कालावधी ग्राह्य धरता येणार नाही. सर्व कागदपत्रांच्या आधारे तसेच प्रतिनिधींनी सुनावणीच्या केलेल्या कथनानुसार मे. ए.एन. मोमीन इजिनीअरींग वर्क्स याच पहिल्या नावाने बिलामध्ये यथोचित बदल करुन तशी जोडणी चालू करुन देण्यात यावी या निष्कर्षाप्रत मंच आला आहे. तसेच नुकसान भरपाईची मागणी ही देतांना मंचाने सर्व कागदपत्रांची पहाणी केल्यावर तसेच श्री. ताडे, उप कार्यकारी अभियंता यांचे कथन व श्रीमती मोमीन यांची भूमिका विचारांत घेवून सत्वर जोडणी आवश्यक आहे ही बाब ध्यानी धरुन तसेच श्रीमती मोमीन यांच्या विनंती नुसार भरपाईची रक्कम न देण्याचा आदेश मंच पारित करीत आहे.

## आदेश

१) मे. ए.एन. मोमीन इंजिनीअरींग वर्क्स एमआयडीसी शिरोली या नावानेच बिलामध्ये सुधारणा करुन जुनीच जोडणी कार्यरत करावी त्यासाठी ग्राहकाने चाचणी अहवालाची पूर्तता त्वरित करावी असा आदेश मंच पारित करीत आहे.

२) ग्राहकाच्या मागणी नुसार ४० एचपी इतक्या भाराची तरतूद वि.प.ने त्वरित करणेची आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :